# भारतीय लोकशाही आणि जागतिक स्थिती : दशा आणि दिशा

**डॉ. संदीप बी. काळे**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

यशवंत महाविद्यालय सेलू, जि.वर्धा

**सारांश (Abstract) :**

समकालीन जागतिक पटलावरील लोकशाही व्यवस्थांचे अवलोकन भारतीय लोकशाही व्यवस्थेशी पडताळून बघितल्यास असे दिसून येते की, अनेक राष्ट्रांनी लोकशाही मूल्यांचा त्याग करण्यास मोठ्या प्रमाणात सुरुवात केली आहे. भारतात सुद्धा शासनव्यवस्था घटनात्मक मूल्ये पायदळी तुडवून अनैतिक राजकारणाचा स्वीकार करताना दिसत आहे. मूलत: कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व प्रसार माध्यमे हे लोकशाही व्यवस्थेचे चार मूलभूत स्तंभ लोककल्याणासाठी आपली भूमिका खंबीरपणे पार पाडतील तेव्हाच लोकशाहीचे मूलभूत प्रारूप अस्तित्वात येणार आहे. भारतीय लोकशाही मागील ७५ वर्षांमध्ये संविधानात्मक चौकटीवर अत्यंत मजबूत आणि यशस्वीपणे विकसीत बनली आहे. समकालीन विश्वात अनेक लोकशाही राष्ट्रांनी लिंगभाव समानता, मानवी हक्क यासंदर्भात आपली भूमिका पार पाडण्यात लक्ष केंद्रीत केले आहे. परंतु त्यांना नागरी स्वातंत्र्ये आणि शासनावरील नियंत्रण याविषयी दक्षतापूर्वक कार्य करणे शक्य झाले नाही. त्यामुळे अनेक लोकशाही व्यवस्थांमध्ये विविध सामाजिक व राजकीय चळवळी सक्रीय बनल्या आहेत. कोरोना महामारीच्या काळात- जागतिक पटलावरील सर्वच लोकशाही राष्ट्रांना चिंतन करणे भाग पाडले आहे.

आरोग्य व शिक्षण हे प्रत्येक लोकशाही व्यवस्थेतील नागरिकांकरिता पायाभूत घटक असल्याची जाणीव महामारीच्या काळात मोठ्या प्रमाणात झाली

आहे. समकालीन भारतीय लोकशाही व्यवस्थेला अधिक सक्षम बनण्यासाठी आणि जागतिक पटलावरील लोकशाही राष्ट्रांना मार्गदर्शक ठरण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सर्वसमावेशक मतदान आणि राजकीय सहभाग (महिलांचा सक्रीय सहभाग) वृद्धिंगत करणे आवश्यक आहे. तरच समकालीन लोकशाही राष्ट्रांची स्थिती आणि गती यथायोग्य दिशेने वाटचाल करु शकणार आहे.

**प्रस्तावना (Introduction):**

"लोकांनी, लोकांचे, लोकांकरिता चालविलेले शासन म्हणजे लोकशाही" असे मत अब्राहम लिंकन यांनी व्यक्त केले होते. परंतु समकालीन राजकीय व्यवस्थेतील वास्तविकतेचे अवलोकन केल्यास लोकशाही व्यवस्थेचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होताना दिसत आहे. शासनव्यवस्था घटनात्मक मूल्ये पायदळी तुडवून अनैतिक राजकारणाचा स्वीकार करताना दिसून येते. अशाप्रकारचे चित्र परावर्तीत करण्याचे धाडस केवळ नागरिक करू शकतात. त्याकरिता 'जबाबदार लोकांनी, जबाबदार लोकांचे, जबाबदार लोकांकरिता चालविलेले शासन म्हणजे लोकशाही" अशाप्रकारची वैचारिक क्रांती घडून येणे आवश्यक आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व प्रसारमाधमे हे लोकशाही व्यवस्थेचे चार मूलभूत स्तंभ लोककल्याणासाठी आपली भूमिका पार पाडतील; तेव्हाच लोकशाहीचे मूलभूत प्रारूप अस्तित्वात येणार आहे. जागतिक पटलावरील अनेक देशांमध्ये लोकशाही व्यवस्थेच्या संदर्भात चिंतनात्मक आणि संशोधनात्मक कार्य करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. प्रत्येक देशातील व्यक्तीला आपण लोकशाही व्यवस्था घटक आहोत याची जाणीव होणे आवश्यक असून त्यासाठी यथायोग्य पध्दतीने मूलभूत अधिकार व स्वातंत्र्य उपलब्ध होणे आवश्यक आहे.

समकालीन वर्षात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अत्यंत उत्साहात संपन्न होत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाहीचे जगविख्यात प्रारूप जागतिक पटलावरील अन्य देशांतील लोकशाही व्यवस्थांच्या संदर्भात विविधांगी दृष्टिकोनातून अवलोकीत करणे आवश्यक आहे. मागील ७५ वर्षात भारतीय लोकशाही संविधानात्मक चौकटीवर अत्यंत मजबूत आणि यशस्वरित्या विकसीत बनली आहे. भारतीय लोकशाहीचे हेच उत्कृष्ट प्रारूप इतर राज्यांनी स्वीकारल्यास त्यांच्या नागरिकांचा अधिकाधिक विकास सहज साध्य होवु शकतो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून विविध राज्य किंवा राष्ट्रांतील विचारधारांवर आधारित लोकशाहिचे प्रारूप आणि समाजवाद आणि भांडवलवाद यांची सांगड घालत कल्याणकारी राज्याची यशस्वी संकल्पना साकारण्यात यशस्वी होत असलेली भारतीय लोकशाही यांचे चिकित्सक विवेचन व विश्लेषण स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**बीजसंज्ञा (Key words) :**

भारतीय लोकशाही, समकालीन जागतिक लोकशाहीचे प्रारूप, लोकशाही संदर्भातील विश्लेषणात्मक निरिक्षणे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे (Objectives of Research Paper) :**

1. समकालीन जागतिक लोकशाहिचे प्रारूप स्पष्ट करणे
2. भारतीय लोकशाहिचे जागतिक पटलावरील अन्य देशासंदर्भातील निरिक्षणांचे अवलोकन करणे.
3. जागतिक पटलावरिल लोकशाही व्यवस्थेची दशा व दिशा विश्लेषित करणे.

**समकालीन भारतीय लोकशाही : जागतिक स्थिती आणि गती**

समकालीन जागतिक व्यवस्थेचे अवलोकन करताना असे दिसून येते की, मागील अनेक दशकांमध्ये लोकशाही विचारतत्वांपासून जाणीवपूर्वक माघार घेत असलेल्या देशांच्या संख्येत अभूतपूर्व वाढ झाली आहे. यामध्ये ब्राझील, भारत आणि अमेरिका यासारख्या जगातील काही सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था असलेल्या देशांचा सुध्दा समावेश आहे. कोविड-१९ महामारी उद्भवल्यानंतर हा कल अधिकच तीव्र चिंताजनक झाला. मागील दोन वर्षामध्ये विशेषतः हंगेरी भारत, फिलिपाईन्स आणि अमेरिका यासारख्या काही देशांमध्ये असंख्य लोकशाही गाभातत्वांवर परिणाम होऊन या तत्वांचे उल्लंघन झाले. लोकशाही विचारतत्वांपासून माघारिची विविध रूपे आढळू शकतात. काही देश (उदा; भारत) धर्माचा वापर एखाद्या राजकीय आयुधासारखा करतात तर काही देश उदा. हंगेरी, पोलंड आणि तुर्कस्थान इत्यादी लिंगभाव समानतेवर आणि एलजीबीटीक्यूआयए या समाजघटकांच्या हक्कांवर हल्ला करताना दिसतात. २०१० यावर्षी जगभरातील बल्गेरिया, एल साल्वाडोर, हंगेरी, भारत, मेक्सिको, फिलिपाईन्स, पोलंड आणि श्रीलंका या आठच देशांनी पारदर्शक निवडणूकांबाबत चांगली कामगिरी केली. मात्र त्याचवेळी नागरी स्वातंत्र्ये आणि शासनावरील नियंत्रण याबाबतीत त्यांची कामगिरी अतिशय वाईट होती. असे स्पष्टीकरण International Institute for Democracy and Electoral Assistance (IIDEA) या आंतरराष्ट्रीय स्तरावरील आंतरसरकारी संस्थेद्वारे 22 नोव्हेंबर २०२१ रोजी घोषित केलेल्या "लोकशाही जागतिक स्थिती अहवाल - २०२१" मध्ये केले आहे.

लोकशाही जागतिक स्थिती अहवाल- २०११ द्वारे जागतिक पटलावरील १६५ देशांचे अध्ययन करण्यात आले. प्रस्तुत अहवाल प्रातिनिधीक शासन, मूलभूत शासनावरील नियंत्रण, पारदर्शक प्रशासन, सहभागाधारित बांधीलकी या आधारभूत

घटकांना प्रमाण मानण्यात आले असून याच घटकांच्या आधारावर जागतिक स्तरावरील लोकशाही व्यवस्थांचे निरिक्षण करण्यात आले आहे. प्रातिनिधीक शासन या घटकाअंतर्गत पारदर्शक निवडणुका, सर्वसमावेशक मतदान, मुक्त राजकीय पक्ष आणि निवडणुकांद्वारे निवडण्यात आलेले शासन या उपघटकांचा विचार करण्यात आला आहे. मूलभूत हक्क या घटकाअंतर्गत न्यायाची प्राप्ती, नागरी स्वातंत्र्ये, सामाजिक हक्क आणि समता हे उपघटक विचारात घेतले गेले. शासनावरील नियंत्रण या घटकांतर्गत कार्यक्षम संसद, न्यायिक स्वातंत्र्ये आणि प्रामाणिक प्रसारमाध्यमे या उपघटकांना लक्षात घेण्यात आले आहे. पारदर्शक प्रशासन या घटकांतर्गत भ्रष्टाचाराचा अभाव आणि अंदाज, करण्यायोग्य अंमलबजावणी या उपघटकांचा समावेश आहे. सहभागाधारित बांधीलकी या घटकाअंतर्गत नागरी समाजाचा सहभाग, निवडणुकांमधील सहभाग, थेट लोकशाही आणि स्थानिक पातळीवरील लोकशाही हे उपघटक लक्षात घेण्यात आले आहेत. व्यापक जागतिक परिदृश्य विचारात घेत असतानाच या अहवालासोबत आफ्रिका आणि मध्यपूर्व, अमेरिकी राष्ट्रे (उत्तर, दक्षिण व मध्य अमेरिका आणि कॅरिबियन बेटे), आशिया पॅसिफिक प्रांत आणि युरोप असे चार प्रादेशिक अहवाल सुद्धा प्रकाशित करण्यात आले आहेत. या अहवालांमध्ये लोकशाही राज्यपद्धती, संकरित राज्यपद्धती व एकाधिकारशाही राज्यपध्दती या तीन प्रकारच्या राज्यपध्दतीचा समावेश आहे. लोकशाही राज्यपद्धतीमध्ये विरोधी पक्षांना सत्तेमध्ये प्रवेश करण्यासाठी स्पर्धात्मक निवडणुकांच्या माध्यमातून संधी उपलब्ध करून दिली जाते. संकरित राज्यपध्दतीमध्ये नागरी समुदायांना आणि प्रसारमाध्यमांना एकाधिकारशाही राज्यपद्धतीच्या तुलनेत काहीसा आधिक खुला परंतु अपुराच अवकाश प्राप्त होतो. पूर्वी लोकशाहीच्या बाबतीत माघार घेतेलेले सुमारे एक तृतीयांश देश हे संकरित लोकशाही राजवटी झाल्या आहेत किंवा एकाधिकारशाही राजवटी तरी झाल्या

आहेत. एकाधिकारशाही राज्य पध्दतीमध्ये बिगर लोकशाही राजवटीतील कोणत्याही लोकशाही घटकाचा -हासच झाल्याचे आढळून येते. संकरित आणि एकाधिकारशाही या दोन्ही राज्यपद्धतींना 'बिगर लोकशाही राजवटी' असे वर्गीकृत करण्यात येते.

लोकशाही संदर्भातील जागतिक स्थिती अहवालानुसार कमकुवत लोकशाही असलेल्या केनियात आणि लोकशाही विचारतत्वांपासून माघार घेणाऱ्या भारतात निवडणुकांदरम्यान इंटरनेट सुविधा बंद पडली. फ्रान्स, भारत आणि सेनेगल या देशांनी पक्ष सदस्यत्वाविषयीचे निकष अधिक अद्ययावत केले. भारतातील आम आदमी पक्षाने (आप) आणि फ्रान्समधील Republigue en Marche ! या पक्षाने सदस्यत्व शुल्क संपूर्णत: काढून टाकले. तसेच 'आप' ने थेट देणग्या स्वीकारण्यासाठी मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले. महामारीच्या काळात वंशवादी वागणूक दिल्याचे आरोप आस्ट्रेलिया विरोधात केले गेले. या देशाने भारतीय वंशाच्या ऑस्ट्रेलियन नागरिकांना पुन्हा ऑस्ट्रेलियात परतण्यावर निर्बंध लादले. महामारिचा परिणाम म्हणून जागतिक पातळीवरच लिंगभाव समतेबाबत असंवेदनशीलता दाखवली गेली. राजकीय नेते लिंगभाव एक हत्यार म्हणून वापरू लागले. यामध्ये युरोपीय महासंघाच्या घोषणापत्रातून लिंगभाव समानता ही संज्ञा काढून टाकणे (हंगेरी, पोलंड), महिलांवरील हिंसाचारासंदर्भातील इस्तंबूल करारामधून बाहेर पडणे (तुर्कस्थान), महिलांच्या हक्कासाठी लढणाऱ्या कार्यकर्त्यांना लक्ष्य करणे (अझरबैजान), कौटुंबिक हिंसाचाराचे कायदे पातक करणे (रशिया) आणि विवाहातंर्गत बलात्काराच्या गुन्हेगारीविरोधी लढा देणे (भारत) यांसारख्या कृतींचा समावेश होता. देशादेशांतील पंथीय आणि वांशिक समूहांदरम्यानही भेदभाव झाल्याचे आढळून आले. महामारी दरम्यान राष्ट्रद्रोह आणि दहशतवादविरोधी कायद्यांचा वापर, मानवी हक्क समर्थक, विद्यार्थी, कार्यकर्ते, संशोधक, अभ्यासक, विरोधी सदस्य आणि अन्य टिकाकार यांच्याविरोधात केला गेला. ब्राझिल,

कोलंबिया, भारत आणि दक्षिण आफ्रिका या देशांतील न्यायव्यवस्थांनी नागरिकांना कायद्याद्वारे देण्यात आलेल्या आश्वासनांची (कायदेशीर हक्क / अधिकार म्हणून अपेक्षित' वस्तू आणि सेवा यांची) पूर्तता करण्यासाठी सरकारांना सकारात्मक पावले उचलणे भाग पाडल्याचे आढळून आले. महामारीचे निराकरण करण्याच्या उपाययोजनांसंदर्भात बहुमतप्राप्त सत्ताधारी पक्षांनी स्वतःला पद्धतशीर व कठोर निरिक्षणांपासून आणि अर्थपूर्ण / सकस सार्वजनिक चर्चापासून दूर ठेवले. याचे प्रत्यंतर हंगेरी, भारत आणि दक्षिण आफ्रिका या देशांमध्ये येते. प्रसारमाध्यमांच्या विश्वासार्हतेच्या बाबतीत मागील आठ वर्षांमध्ये लक्षणीय -हास झालेल्या देशांची संख्या ही याबाबत सुधारणा झालेल्या देशांच्या संख्येच्या तुलनेत वाढल्याचे दिसते. जाहिरांतींमधून मिळणाच्या उत्पन्नातील घसरण, प्रसारमाध्यमांच्या मालकीचे वाढते केंद्रकिरण, ऑनलाइन प्रसारमाध्यमांची मोफत उपलब्धता, कार्यक्रमपत्रिका निश्चित करण्यामधील समाजमाध्यमांची महत्वपूर्ण भूमिका आणि चुकीच्या माहितीचा प्रसार या घटकांमुळे लोकांचा प्रसारमाध्यमांवरील विश्वास डळमळीत झाला. त्यातूनच प्रसारमाध्यमांच्या दमनासाठी सुपीक पार्श्वभूमी तयार झाली. उदा. इंटरनेट सुविधा वारंवार खंडित झाल्याने काश्मीरमधील घटनांचे वृत्तांकन करण्याची प्रसारमाध्यमांची क्षमता मर्यादित झाली.

मिडिया फ्रीडम रॅपिड रिस्पॉन्स (MFRR) या जून-२०२१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, पत्रकारांविरोधातील दडपण वाढले आहे. परिणामी सेल्फ सेन्सॉरशिपमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. यामधूनच पुढे माहिती मिळविण्याच्या लोकांच्या क्षमतेत घसरण झाल्याचे दिसून येते पत्रकारीतेसाठी प्रतिकुलतेच्या पार्श्वभूमीवर पत्रकारांचे दमन करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. याचे प्रत्यंतर काही निवडक वेबसाईट बंद करणे (उदा. चीन, इजिप्त किंवा व्हेनेझुएला) पत्रकाराचे फोन हॅक करणे (उदा, मेक्सिको किंवा सौदी अरेबिया) किंवा

पत्रकारांवर ऑनलाइन हल्ले करणे (भारत किंवा रशिया) या घटनांमधून येते. महामारीदरम्यान अनेकविध मुद्यांवरून करण्यात आलेल्या जनआंदोलनांमध्ये महामारी हाताळणीमधील सुरकारबद्दलची नाराजी (उदा: / ब्राझील, सर्बिया आणि थायलंड); राहणीमानाचा घसरलेला दर्जा आणि भ्रष्टाचार याबद्दलचा संताप (उदा; कोलंबिया, क्यूबा, इराक, लेबनॉन, दक्षिण आफ्रिका आणि ट्युनिशिया); वांशिक भेदभाव (ब्लॅक' लाईव्हज मॅटर ही जागतिक चळवळ) किंवा शेतीमालाच्या वाढत्या किंमती (भारत) या आंदोलनाचा समावेश होतो. लोकशाही राज्यपद्धतीपासून माघार घेत असलेल्या देशांमध्ये शासनावरील नियंत्रणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य संघटित होण्याचे स्वातंत्र्य यासारखी स्वातंत्र्ये अतिशय सावकाश, मात्र लक्षणीयरित्या कमकुवत केली जातात. त्यासाठी कायद्याचे राज्य आणि नागरी अवकाश कमकुवत करण्याच्या उद्देशाने सहेतूक धोरण आखणी आणि सुधारणा केल्या जातात. अशा माघारीमुळे, कोणत्याच टप्प्यावरील लोकशाहीच्या कामगिरीवर परिणाम होतात. असे देश जागतिका लोकसंख्येपैकी ३० टक्के लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व करतात. निवडणुकांच्या माध्यमातून प्राप्त झालेला जनाधार नष्ट होतो आणि सत्तेत राहण्यासाठी सत्ताधारी सरकारे निवडणुक प्रक्रियेत हस्तक्षेप करतात तेव्हा या देशांमधील लोकशाही व्यवस्था कोलमडून पडते. नष्ट होत चाललेल्या लोकशाही देशांमध्ये कोणत्याहीँ लोकशाही पैलूत मागील ५-१० वर्षांमध्ये सांख्यिकीदृष्ट्या लक्षणीय घसरण झाल्याचे अनुभवाला येते. कमकुवत लोकशाही देशांमध्ये लोकशाहीच्या पहिल्या स्थित्यतरांपासून कोणत्याही टप्प्यावर बिगर लोकशाही हस्तक्षेप अनुभवाला येतात. नागरी सक्रियता या दृष्टिकोनातून विचार केल्यास असे स्पष्ट होते की, ' द मिल्क टी अलायन्स इन एशिया' या बहुराष्ट्रीय निदर्शने करणाऱ्या ऑनलाईन चळवळीने भारत, मलेशिया, म्यानमार, फिलिपाईन्स तैवान आणि थायलंड या आशियाई देशांतील लोकशाही कार्यकर्त्यांना विशेषतः

युवकांना लोकशाही प्रेरणांची ताकद दाखवून देत निदर्शनांच्या व्यूहरचनांची सुलभ देवाणघेवाण कशी करता येते, हे दाखवून दिले. भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त डॉ. एस. वाय. कुरेशी यांच्या मते, "लोकशाही संदर्भात भारताची घसरण झाली असली तरी भारतीय लोकांमधील लोकशाही तत्वे दृढ राहिली आहेत. जगभरातील लोकशाही व्यवस्था एक पाऊल मागे गेल्या असून १९९५ पासून जगातील अधिकांश देश एकाधिकारशाहीकडे वाटचाल करताना दिसतात. तथापि, लोकशाहीच्या लवचिकतवर माझा विश्वास असून अंतिमत: लोकशाहीचाच विजय होणार हे निश्चित आहे". थोडक्यात लोकशाही राष्ट्रांनी लोकशाहीचे बीजारोपण करताना लोकशाही संदर्भातील सिद्धांत आणि मूल्ये यांची पायाभरणी करण्यासाठी धोरणात्मक पाऊल उचलणे आवश्यक आहे. भारतीय लोकशाही व्यवस्थेचा गौरवशाली वारसा समकालीन वर्षात अमृत महोत्सव (७५ वर्षे) साजरा करीत आहे. त्या दृष्टिकोनातून भारतातील प्रत्येक व्यक्तीला आधुनिक जीवन प्रवाहात समाविष्ट करून त्याला सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी सर्वसमावेशक मानवी हक्क सहज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचे वास्तविकतेवरुन स्पष्ट होते. त्याशिवाय भारतीय लोकशाहीचे प्रारूप समकालीन विश्वाला मार्गदर्शन करण्यास पात्र ठरणार नाही, असे वाटते.

**मूल्यांकन (Conclusion) :**

समकालीन जागतिक व्यवस्थेतील लोकशाहीला अधिकाधिक मजबूत बनविण्यासाठी अनेक सकारात्मक धोरणे यशस्वीपणे राबविणे आवश्यक आहे. मानवी हक्क विषयक तत्वे आणि कार्यपद्धती यासह लष्करी व सुरक्षाविषयक बाबींवर नागरी नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक सुधारणा कराव्यात. तसेच त्यांच्या जबाबदाऱ्यांचे सुस्पष्ट विभाजन करावे. याचा लोकसंख्येचे व्यापक प्रतिनिधीत्व करणाऱ्या सांसदीय आणि स्वतंत्र संस्थांच्या माध्यमातून आढावा घेत जबाबदारी

निश्चित करावी. याद्वारे नागरी समुहांच्या प्रतिनिधींच्या सहभागालाही उत्तेजन द्यावे. महामारी किंवा यासारख्या अरिष्टांचे निराकरण करताना शासनांनी आपल्या कामगिरीचे आणि सांविधानिक व कायदेशीर चौकटीचे राष्ट्रीय परीक्षण करावे. यामध्ये सर्वपक्षीय संसद सदस्य, तसेच आरोग्य, शिक्षण, कायदा, संशोधन आणि पोलीस या क्षेत्रातील प्रतिनिधींसह सार्वजनिक सल्लागार संस्थांनाही सहभागी करून घ्यावे. अशा परिक्षणांतील निष्कर्ष सार्वजनिकरित्या प्रसिद्ध करण्यात यावेत. आपत्तीकालीन परिस्थिती सुस्पष्ट आणि निःसंदिग्ध शब्दांमध्ये जाहिर करणाऱ्या तरतुदींचा समावेश संबंधित कायद्यामध्ये करावा. अशाप्रकाराला अपवादात्मक उपाययोजना स्वीकारताना या प्रक्रियेची कालमर्यादा सुनिश्चित करावी. तसेच अशा आपत्कालीन परिस्थितीत विधीमंडळ आणि न्यायपालिका यांच्याकडे पुनरावलोकनाची भूमिका सोपविण्यात यावी. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याची आणि पुरेशा लवचिकतेसह निवडणुका पार पाडण्याचे अधिकार निवडणूक व्यवस्थापन संस्थांकडे सोपवावेत. यामध्ये अपवादात्मक परिस्थितीत मतदानाचे प्रमाण वाढविण्याचे मार्ग निश्चित करण्याचे (उदा; मतदानाचे तास वाढविणे इत्यादी) अधिकार दिले जावेत या संस्थांमध्ये आपत्कालीन परिस्थितीत स्वतंत्रपणे आणि जलद निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होण्यासाठी आवश्यक व्यवस्था उभारावी. भविष्यात आपत्कालीन परिस्थितीत निवडणुकांचे व्यवस्थापन करण्यासाठी निवडणुकांची ठोस, मात्र लवचिक चौकट असणे आवश्यक आहे. महामारी हाताळताना (विकेंद्रीत निर्णयनिर्मिती सह) विकेंद्रीत आणि बहुस्तरिय शासनांच्या लाभांचे प्रारूप समोर आले. महामारिचे महिलांवरील परिणाम हे तुलनेने अधिक असतात. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील भविष्यकालीन प्रतिसादांमध्ये त्यांच्या गरजा विचारात घेतल्या जाव्यात. विशेषत: औपचारिक आरोग्य व्यवस्थेमध्ये त्यांना सामावून घ्यावे. सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षा कायम

राखण्याबाबत (औपचारिक आणि अनौपचारिक आघाड्यांवर प्रामुख्याने महिलांचाच समावेश असतो हे महामारिदरम्यान अधोरेखीत झाले. स्थलांतरित मजुरांच्या हक्कांसंदर्भातील नियामक राष्ट्रीय कायदेशीर चौकटी लक्षणीयरित्या अद्ययावत किंवा सुधारित कराव्यात. वांशिक / धार्मिक राष्ट्रवादाच्या उदयामुळे द्वेषपूर्ण वक्तव्ये आणि ऑनलाईन माध्यमातून परकीय नागरिकांचा मत्सर (ऑनलाइन सेनोफोबिया) यांच्याशी संबंधीत कायदे अधिक मजबूत आणि अद्ययावत करावेत. आंतरराष्ट्रीय समुदायाने आणि प्रादेशिक सत्तांनी लोकशाहीसाठीच्या नागरी चळवळींना पाठींबा घावा. या चळवळी शासकीय शक्तींच्या (सशस्त्र दलांच्या) दमनकारी कृत्यांना थेट प्रतिसाद म्हणून उभ्या राहिलेल्या असू शकतात. स्थानिक पातळीवरील नागरी सक्रियता हाच बंदिस्त स्वरूपाच्या समाजांमध्ये बदल / सुधारणा घडवून आणण्याचा मार्ग आहे. लोकशाही मूल्ये आणि हक्क, याकरिता दीर्घकालीन नागरी शिक्षण ही लोकशाहीच्या भविष्यासाठी केलेली बहुमूल्य स्वरुपाची गुंतवणूक ठरते. समकालीन विश्वातील खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येक राष्ट्र महासत्ता किंवा सामर्थ्यशाली राष्ट्र बनण्यासाठी धडपडत आहे. परंतु या प्रक्रियेत राष्ट्र जोपर्यंत आपल्या नागरिकांचा सर्वांगीण विकासाकरिता आवश्यक असणारे मूलभूत हक्क आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत नाही तोपर्यंत राष्ट्र विकसीत किंवा सामर्थ्यशाली बनू शकत नाही. अर्थात प्रत्येक राष्ट्राला कल्याणकारी राज्याची सैद्धांतिक संकल्पना स्वीकारून चालत नाही तर त्याचे धोरणात्मक प्रारूप प्रत्यक्षात साकार करणे काळाची आवश्यकता आहे असे समकालीन जागतिक पटलावरील लोकशाही व्यवस्थांच्या अवलोकनावरून दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची (Bibliography) :**

Grover, Virender (1997). *The Constitution of India*. New Delhi : Deep & Deep Publications.

Sharma, Gokulesh (2004). *Human Rights & Social Justice*. New Delhi : Deep & Deep Publications.

राय, शीला (संपा.) *सामाजिक, आर्थिक व राजनीतीक न्याय (संविधानिक निहितार्थ और व्यावहारिक आयाम)*. जयपूर : रशिका पब्लिशिंग हाऊस.

भोळे, भास्कर लक्ष्मण (2003). *भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण.* नागपूर : पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स.

पळशीकर, सुहास (2009). *समकालीन भारतीय राजकारण.* पुणे : प्रतिमा प्रकाशन.

व्होरा, राजेंद्र आणि पळशीकर सुहास (2010). *भारतीय लोकशाही (अर्थ आणि व्यवहार).* पुणे : डायमंड पब्लिकेशन.

पाटील. बी. बी. (2010). *भारतीय शासन आणि राजकारण.* कोल्हापूर : फडके प्रकाशन.

देवगावरक, रा. गो. (2007). *पंचायत राज आणि सामुहिक विकास.* नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

*योजना,* (हिंदी मासिक) जनवरी 2009) दिल्ली : प्रकाशन विभाग भारत सरकार.

(हिंदी मासिक) (अक्तूबर 2004). दिल्ली : साहित्य भवन पब्लिकेशन.

www.nios.ac.in/media/documents/SecSocSciCour/English/lesson-2-3pdf

www.Vedantu.com

www.evirtualguru.com/essay-on-challenges-to-indian-democracy-complete-essay

www.foreignaffairs.com/articles/india/2021-03-18/decay-indian-democracy

https://www.marathisocial.com

https://www.essymarathi.com

https://brainly.in